देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सह. सा. कारखाना लि.,
**लिज युनिट ऑफ श्री रेणुका शुगर्स लि., गंगानगर-इचलकरंजी,**
**ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर.**

---

दिनांक २२-०९-२०२५

# परिपत्रक

## कारखाना सभासद साखर वाटप

आपल्या कारखान्याच्या 'अ' वर्ग व 'ब' वर्ग सभासद यांना सवलतीच्या दरामध्ये वार्षिक साखर वाटपाचे धोरण प्रतिवर्षी ठरविले जाते त्यानुसार ज्या उत्पादक सभासदांनी हंगाम **२०२४-२०२५** मध्ये ऊस पुरवठा केलेला आहे त्यांना व 'ब' वर्ग सभासदांना प्रथम शेअरला २० किलो व पुढील प्रत्येक शेअरला ५ किलो याप्रमाणे, तसेच ज्या सभासदांनी ऊस पुरवठा केलेला नाही अशा सभासदासाठी प्रथम शेअरला १५ किलो व पुढील प्रत्येक शेअरला ५ किलो याप्रमाणे **शुक्रवार दिनांक २६-०९-२०२५ पासून शनिवार दिनांक २५-१०-२०२५** अखेर साखर वाटप कारखाना कार्यस्थळावर सुरु राहील. सदर साखरेचा दर प्रती किलो **रु.१५/-** याप्रमाणे राहील.

साखर घेणेसाठी येणा-या सभासदानी येताना स्वतःचे १) निवडणूक ओळखपत्र २)पॅनकार्ड ३) फोटो असलेले बॅन्क पासबुक ४) आधार कार्ड ५) ड्रायव्हींग लायसेन्स यापैकी कोणतेही एक ओळखपत्राची झेरॉक्स घेवून येणेची आहे. ओळखपत्राशिवाय साखर मिळणार नाही.

तसेच जे सभासद कारखान्याकडे येऊ शकणार नाहीत अशांनी आपले अधिकारपत्र हजर करुन साखर घेणेची आहे. अधिकारपत्र हजर करणा-या व्यक्तीने सभासदाचे व स्वतःचे ओळखपत्र दिले शिवाय साखर मिळणार नाही.

सभासदांकडून सदर साखर खरेदीपोटी ए.टी.एम. कार्ड (ATM Card)/ Debit Card द्वारे अथवा रोखीने रक्कम स्विकारली जाईल.

**साखर वाटपाची अंतिम मुदत शनिवार दिनांक २५-१०-२०२५ पर्यन्त राहील. या तारखेनंतर कोणत्याही सबबीवर साखर दिली जाणार नाही. साखर वाटपाची वेळ सकाळी ९.०० ते सायं.५.०० याप्रमाणे राहील.**

सभासद साखर वाटप प्रत्येक रविवारी व सार्वजनिक सुट्टी दि. ०२/१०/२०२५ रोजी (विजया दशमी दसरा) तसेच दिनांक २०-१०-२०२५, २१-१०-२०२५ २२-१०-२०२५ आणि २३-१०-२०२५ ( दिपावली निमित्त ) साखर वाटप बंद राहिल.

*( **सुचना :-** जे सभासद एकत्रीतरित्या अधिकारपत्र हजर करून साखर घेणार आहेत किंवा सोसायटी मार्फत साखर घेऊ इच्छितात त्यांनी आपली सर्व साखर **शनिवार दिनांक १८-१०-२०२५** पूर्वी उचल करावी.)*

प्र. कार्यकारी संचालक

मॅनेजर
(एच.आर.अँड ॲडमिन)

असो. व्हा. प्रेसिडेंड
(वर्क्स)

देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सह. सा. कारखाना लि.,
लिज युनिट ऑफ श्री रेणुका शुगर्स लि., गंगानगर-इचलकरंजी.